शुक्रवार, दि २८ फेब्रुवारी २०२५ ● जालना ● वर्ष १२ वे ● अंक २२ वा ● किंमत २ रु. ● पाने ४ RNI: MAHMAR/2013/50827 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/

## इकरा अपहरण प्रकरणाच्या उच्चस्तरीय तपासाची खा. कल्याण काळे यांची मागणी

### शिष्टमंडळाने दिले जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन



**जालना । प्रतिनिधी -** अंबड शहरातील फैसलाबाद कॉलनी येथील ३ वर्षीय इकरा अमजद मनियार मुलीच्या अपहरण प्रकरणाचा १२ जानेवारी २०२५ पासून शोध सुरू आहे. मात्र, ४६ दिवस उलटूनही तपासाला वेग आलेला नाही. त्यामुळे मुलीच्या कुटुंबीयांवर मोठा मानसिक ताण येत असून, पोलीस प्रशासनाच्या कार्यक्षमतेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या घटनेच्या उच्चस्तरीय तपासाची मागणी खा. डॉ. कल्याण काळे यांनी केली असून, त्यांच्यामार्फत काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर केले.

खा. डॉ. काळे यांच्यावतीने अंबड तालुका काँग्रेसचे **पान २ वर**

## देशातील युवा परदेशात जातोय... हे थांबलं पाहिजे - सपा राज्य उपाध्यक्ष जोशी

### आगामी निवडणुकीच्या अनुषंगाने समाजवादी पक्षाची बैठक संपन्न

**जालना । प्रतिनिधी -** देशातील युवा हा परदेशात जात आहे. या युवकांना आपल्या देशात शिक्षण आणि रोजगाराबाबत साशंकता आहे. याचाच अर्थ त्यांना भारत देश हा चांगला नसल्याचे जाणवते, हे थांबलं पाहिजे, असे प्रतिपादन समाजवादी पक्षाचे राज्य उपाध्यक्ष डॉ. प्रभाकर जोशी पाटोदेकर यांनी येथे केले.

ते ४८८ विश्रामगृह येथे गुरुवार (दि २७) रोजी जिल्हा कार्यकारिणीची आयोजित बैठकीत बोलत होते. यावेळी राज्य सरचिटणीस डॉ. अब्दुल रऊफ, जिल्हाध्यक्ष शेख नबी सिपोराकर



यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रसंगी जिल्हा कार्यकारिणीतील विविध पदाच्या नियुक्त्याही करण्यात आल्या.

यावेळी पुढे बोलतांना श्री जोशी यांनी म्हटले आहे की, भारतातून परदेशात जाणारे युवकांची मानसिकता भारत हा देश चांगला नसल्याची आहे, येथे शिक्षण आणि रोजगाराचे प्रश्न आहेत. त्याच बरोबर डॉलरच्या तुलनेत रुपया घसरत चालला आहे. अशा वेळी अमेरिकेत गेल्यावर डॉलरच्या माध्यमातून चांगली कमाई करता येईल असे ध्येय **पान २ वर**

### युवा आदर्श

### मराठी गौरव ...

मराठीभाषी कपाळा
अभिजात टिळा गौरव
तपश्चर्या आली फळा
सफळ संपूर्ण आग्रव
लाभले भाषेचे वरदान
कृतकृत्य होती मानव
भाषा विवाद पसरवी
कुवृत्तीचे पिसाट दानव
अखिल विश्वा विश्वास
कळेलं ममत्व मार्दव
कधी पंचपक्वान्न वाटे
बनते ती चविष्ट सौंधव
दिपतीलं छात्रांचे अक्ष
अद्वितीय मराठी वैभव
पहा तर बोलून मराठी
काहीचं नाही असंभव
भाषा सोपी शिकावयां
सरलेताचा ये अनुभव
अतर्क्य तशी सखोल
सौंदर्य दिप व अभिनव
माने अन्य भाषा भगिनी
कुणांस नसतो उपद्रव
अक्षरे बनती मौक्तिक
स्नेहभावे जरासे गिरव
मराठी अमूल्य दागिना
शारदेच्या कर्णी तानव
चांदणे शब्दालंकारांचे
भाषांगणी हसरी पुनव

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## मानवी जीवनात कविता स्त्रियांची सुख-दुःखाची साक्षीदार - श्रीमती मंगल धुपे

**जालना । प्रतिनिधी -** मानवी जीवनात कविता सुख-दुःखाची साक्षीदार असते, कळत नकळत ती स्त्रियांचे सुख -दुःख जगासोबत समोर मांडत असते, असे प्रतिपादन जेईएस महाविद्यालय जालना येथे मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित 'काव्यधारा 'या महिला कवयीत्रींच्या कवी संमेलनामध्ये जालना जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकारी श्रीमती मंगल धुपे यांनी केले.

महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा समिती जालना व जेईएस महाविद्यालय जालनाच्या मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने,मराठी भाषा गौरव दिनानिमित्त 'काव्यधारा'निमंत्रित महिला कवयित्रींचे कवी संमेलनाचे आयोजन दि. २७फ `ब्रुवारी २०२५ गुरुवार रोजी सकाळी ११ वाजता महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजन केले होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री, तर प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकारी श्रीमती मंगल धुपे या होत्या. व्यासपीठावर निमंत्रित कवयित्री छत्रपती संभाजीनगरच्या प्रिया धारूरकर, जालन्यातील सुप्रसिद्ध कवयित्री डॉ. संजीवनी तळेगावकर, रेखा गतखणे ,वैशाली फोके ,कविता नरवडे ,रत्नमाला मोहिते,आरती सदावर्ते तसेच सत्यशीला तोर आदींची उपस्थिती होती.

कविवर्य कुसुमाग्रजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व मराठी भाषा गौरव गीत गायन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी भाषा समिती सदस्य प्रा. डॉ.राजेंद्र सोनवणे यांनी केले ,यावेळी बोलताना ते म्हणाले की मराठी भाषेचा प्रचार व प्रसार व्हावा यासाठी साहित्यिकांच्या कार्यक्रमांचे आयोजन मराठी भाषा समितीतर्फे केले जाते. महाराष्ट्राची मातृभाषा मराठी असून, ती ज्ञानभाषा व्हावी, उच्च शिक्षणही मातृभाषेतूनच मिळावे. असेही प्रा.डॉ. सोनवणे यांनी सांगितले. यावेळी मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ.यशवंत सोनुने यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, जेईएस महाविद्यालयाची मराठी विभागाची कामगिरी व यशाची **पान २ वर**





# संपादकीय

## राष्ट्रीय विज्ञान दिन

संपूर्ण देशात आजचा दिवस हा राष्ट्रीय विज्ञान दिन म्हणून साजरा केला जातो. २८ फेब्रुवारी १९२८ रोजी नोबेल पारितोषिक विजेते भारतीय शास्त्रज्ञ सर सी व्ही रामन यांनी रामन इफेक्ट हा वैशिष्टयपूर्ण शोधनिबंध जगासमोर सादर केला होता. त्या दिवसाचे औचित्य साधून हा दिवस राष्ट्रीय विज्ञान दिन म्हणून साजरा केला जातो. भारतात शास्त्रीय, शैक्षणिक, वैद्यकीय, तांत्रिक, संशोधन आणि सर्व महाविद्यालये, विद्यापीठे, शैक्षणिक संस्था, शास्त्रज्ञ, संशोधक हा दिवस उत्साहाने साजरा करतात. भारतासाठी पहिले नोबेल पारितोषिक मिळवून देणारे जेष्ठ शास्त्रज्ञ भारतरत्न सर सी व्ही रामन यांनी २८ फेब्रुवारी १९२८ या दिवशी भौतिक शास्त्रातील अत्यंत महत्त्वपूर्ण अशा प्रकाशाच्या विकीरणासंबंधी संशोधन करून त्याविषयीचा वैशिष्ट्यपूर्ण शोधनिबंध जागतिक पातळीवर सादर केला. त्यांच्या या शोध निबंधाला १९३० साली मान्यता मिळाली आणि त्याच वर्षी या संशोधनासाठी त्यांना नोबेल पुरस्कार जाहीर झाला. सी व्ही रामन हे नोबेल पारितोषिक मिळवणारे पहिले आशियाई शास्त्रज्ञ आहेत. त्यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून त्यांच्या जन्मशताब्दी वर्षापासून म्हणजेच १९८७ पासून २८ फेब्रुवारी हा दिवस राष्ट्रीय विज्ञान म्हणून साजरा म्हणून साजरा केला जातो. रामन यांचा जन्म ७ नोव्हेंबर १८८८ रोजी मद्रास येथे झाला. त्यांचे पूर्ण नाव चंद्रशेखर व्यंकट रामन असे होते. शालेय वयात रामन हे अत्यंत तल्लख बुद्धीचे होते. रामन यांनी ११ व्या वर्षीच शालेय शिक्षण पूर्ण केले. १५ व्या वर्षी ते इंग्रजी आणि विज्ञानामध्ये पदवीधर झाले तर १७ व्या वर्षी भौतिक शास्त्रात पदव्युत्तर शिक्षण मद्रासमध्ये उच्च श्रेणीमध्ये पूर्ण केले. त्यांनतर ते कोलकाता येथे डेप्युटी अकाउंटट जनरल पदावर रुजू झाले झाले पण या नोकरीत त्यांचे मन रमेना म्हणून त्यांनी कोलकाता येथे कमी पगारात भौतिक शास्त्राचे प्राध्यापक म्हणून काम केले. प्राध्यापक म्हणून अध्यापन करीत असतानाही त्यांनी आपले संशोधन सुरूच ठेवले. १९२१ मध्ये कोलकाता विद्यापीठाने त्यांना उच्च शिक्षणासाठी ब्रिटनला पाठवले. तिथे त्यांनी लंडनच्या रॉयल सोसायटीमध्ये भारतीय तंतुवाद्ये हा शोधनिबंध सादर केला. पुढे १९३५ मध्ये भारतीय तंतुवाद्ये विशेष करून तबल्याची नादनिर्मिती, तबल्याची पुडी, शाई, तरंगलांबी इत्यादींवर संशोधन केले. युरोपातून समुद्रमार्गे भारतात येत असताना आकाशातील निळा रंग पाहून त्यांना या रंगाविषयी कुतूहल जागृत झाले. आकाश निळ्या रंगाचेच का दिसते असा प्रश्न त्यांना पडला. त्याचे उत्तर शोधण्यासाठी त्यांनी पाणी, बर्फ यामधून प्रकाशाचे विकिरण यावर संशोधन सुरू केले. या संशोधनातून त्यांना आकाशाच्या निळ्या रंगाचे उत्तर मिळाले. रामन इफेक्ट म्हणजे प्रकाशाचे विकिरणच. प्रकाशाचे विकिकरण हा एक दृश्य परिणाम आहे. अशा प्रकारचे किरण सरळ जेंव्हा आपल्या डोळ्यांत शिरतात, तेंव्हाच आपल्याला प्रकाशाच्या अस्तित्वाची जाणीव होते. रामन हे सुरवातीला स्फटिकांच्या अणू रचनेसंबंधी आढळणाऱ्या रचना साधर्म्याशी अपवादात्मक असा अभ्यास करत होते. या दरम्यान १९२८ साली त्यांना असे आढळून आले की विकिरीत प्रकाशामध्ये मूळ प्रकाशाइतक्या तरंग लांबीच्या किरणांबरोबर इतरही प्रकाश किरणांचे अस्तित्व असते, ज्यांचा मागमूसही मूळ प्रकाश किरणांमध्ये नव्हता. या नवीन किरणांचा जास्त अचूक अभ्यास करण्यासाठी त्यांनी पाऱ्याच्या विद्युतदीपघटापासून मिळणारी तरंग लांबी अभ्यासली आणि त्यातून त्यांच्या नवीन निष्कर्षाला, संशोधनाला बळकटी मिळाली. प्रकाशामध्ये कण स्वरूपाशी साधर्म्य सांगणारे काही गुणधर्म असतात, त्यांच्या प्रकाश कनिकांमधील ऊर्जा ही त्या प्रकाशाच्या कंपन संख्येच्या समप्रमाणात असते. त्यांचा हाच शोधनिबंध रामन इफेक्ट म्हणून ओळखला जाऊ लागला. त्यांच्या या अत्यंत मौलिक आणि आणि अनमोल अशा संशोधनामुळे पुढे अनेक शोध लागले. भौतिक शास्त्रात सध्या जे शोध लागत आहेत त्याचे मूळ याच रामन इफेक्ट मध्ये सामावलेले असते. रामन इफेक्टमुळे माहितीचे भांडार खुले झाले. त्यामुळेच देशातील १७ विद्यापीठांनी तसेच जगातील ८ विद्यापीठांनी त्यांना सन्मानीय डॉक्टरेट फेलोशिप बहाल केली. १९४३ मध्ये रामन यांनी बंगलोर येथे रामन संशोधन संस्थेची स्थापना केली. या संशोधन संस्थेत भौतिक शास्त्रातील संशोधनाला अग्रक्रम देण्यात आला. १९५४ साली भारत सरकारने भारतरत्न हा देशाचा सर्वोच्च पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला. १९५७ साली आंतरराष्ट्रीय लेनिन पुरस्कारासाठी त्यांची निवड झाली. आपण लावलेल्या शोधाचा उपयोग रचनात्मक कार्यासाठी व्हायला हवा विध्वंसक कार्यासाठी त्याचा उपयोग होऊ नये असे त्यांचे मत होते. १२ नोव्हेंबर १९७० रोजी त्यांचे निधन झाले. राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या सर्व भारतीयांना मनापासून शुभेच्छा!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# साहित्य महामंडळ: दादा नव्हे, आई व्हावे !

साहित्य संमेलन: लोटांगण घालून स्वाभिमान कसा जपणार ? या माझ्या लेखावर आलेल्या असंख्य मान्यवरांच्या,साहित्य प्रेमी,रसिकांच्या मिळालेल्या प्रतिसादावर ,माझ्या विचारांवर आणि आंतरजाल वर उपलब्ध असलेली माहिती याच्या आधारावर मी पुढील लेख लिहिला आहे.

९८ वे अखिल भारतीय साहित्य संमेलन नुकतेच नवी दिल्ली येथे होऊन गेले. हा ९८ आकडा वाचून कदाचित असे वाटू शकते की, हे संमेलन गेली ९८ वर्षे भरत आहे. पण वस्तुस्थिती तशी नाही.

**पहिले संमेलन**

ग्रंथ प्रसाराला चालना मिळावी,त्यासाठी एकत्र येऊन विचार विनिमय व्हावा या हेतूने न्या. महादेव गोविंद रानडे आणि लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख यांनी असे संमेलन आयोजित करण्याबाबतचे आवाहन पुण्यातूनच प्रकाशित होणाऱ्या ज्ञानप्रकाश वृत्तपत्राच्या ७ फेब्रुवारी १८७८ रोजीच्या अंकात प्रसिद्ध केले होते.त्यानुसार पहिले मराठी साहित्य संमेलन ( त्या काळात साहित्यिक या ऐवजी ग्रंथकार म्हणत,पण आता साहित्यिक शब्द रूढ झाल्याने मी साहित्यिक हाच शब्द योजत आहे) ११ मे १८७८ रोजी पुणे येथे न्या. महादेव गोविंद रानडे यांच्याच अध्यक्षतेखाली भरले होते. तर दुसरे संमेलन तब्बल ७ वर्षांनी,म्हणजे १८८५ साली पुन्हा पुण्यातच बुधवार पेठेतील दाणे आळीतील ( आज ही दाणे आळी, बुधवार पेठ कशासाठी कुख्यात झाली आहे,हे पाहिले की,हा इतिहास
वाचून आश्चर्य वाटते!)
पुणे सार्वजनिक सभेच्या जोशी सभागृहात झाले होते. तर तिसरे संमेलन २० वर्षांनी १ मे १९०५ रोजी सातारा येथे वकील र पा उर्फ दादासाहेब करंदीकर यांच्या अध्यक्षतेखाली भरले होते. थोडक्यात संमेलने जरी ९८ झाली असली तरी मराठी साहित्य संमेलनाचा इतिहास हा १४५ वर्षांचा आहे.

**साहित्य महामंडळ**

मुंबई प्रदेश, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ,मराठवाडा हे भाग एकत्र येऊन १ मे १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाली. त्यामुळे साहित्य व्यवहारात सुसूत्रता येण्यासाठी त्याच वर्षी महाराष्ट्रातील भौगोलिक परिस्थिती नुसार स्थापन झालेल्या महाराष्ट्र साहित्य परिषद,पुणे, मुंबई मराठी साहित्य संघ, मराठवाडा साहित्य परिषद , छत्रपती संभाजीनगर आणि विदर्भ साहित्य संघ,नागपूर या संस्था एकत्र आल्या आणि त्यांनी
अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाची स्थापना केली. या महामंडळाचा चांगला विस्तार झाला असून आज मितीला महामंडळाच्या ३५० शाखा असून १२ हजारच्या वर सदस्य आहेत. महामंडळाच्या महाराष्ट्राबाहेर कर्नाटक,गोवा, छत्तीसगड, मध्य प्रदेश या राज्यातील काही शहरात शाखा आहेत.

हे महामंडळ संमेलनासाठी निमंत्रण देणाऱ्या संस्थांच्या निमंत्रणावरून निवड करून संमेलनाचे स्थळ निश्चित करून स्थानिक आयोजक संस्थेच्या सहाय्याने दर वर्षी साहित्य संमेलन भरवित असते.

पूर्वी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षांची निवड ही या पदासाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांची निवडणूक होऊन होत असे. मात्र गेली काही वर्षे अशी निवडणूक न होता, महामंडळ ठरवेल त्या साहित्यिकाची संमेलनाचे अध्यक्ष म्हणून निवड करण्यात येते.

**भरलेली संमेलने**

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलने ही प्रामुख्याने महाराष्ट्रात होत असली तरी महाराष्ट्राबाहेर इतर राज्यातच नव्हे तर विश्व साहित्य संमेलन म्हणून अमेरिका (२००९) , दुबई (२०१०), सिंगापूर (२०११), कॅनडा (२०१२) या देशात तसेच पोर्टल ब्लेअर ( २०१५) अशी भरली होती. तर गेली ३ वर्षे महाराष्ट्र शासनाच विश्व मराठी संमेलन आयोजित करीत आहे. या शिवाय अनेक छोट्या मोठ्या, नोंदणीकृत, अनोंदणीकृत संस्था,व्यक्ती विश्व अथवा जागतिक नावाने विविध देशात संमेलने आणि त्याला जोडून पर्यटन असे उपक्रम सशुल्क आयोजित करीत असतात. या शिवाय विविध देशातील मराठी मंडळे त्या त्या देशात,खंडात संमेलने आयोजित करीत असतात.

**३८३ संमेलने**

आज अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या ३ दिवस चालणाऱ्या प्रमुख संमेलना व्यतिरिक्त मराठी मातृभाषा असलेल्या विविध राजकीय,साहित्यिक,
सामाजिक विचारधारा असलेल्यांची , धर्मियांची, जातींची, घटकांची, विभागांची, जिल्ह्यांची मिळून जवळपास ३८३ संमेलने
महाराष्ट्रात होत असतात. अशी संमेलने आयोजित करणाऱ्या ,निकषांची पूर्तता करणाऱ्या संस्थांना महाराष्ट्र शासन अनुदान देखील देत असते.

एकंदरीत उपरोक्त सर्व साहित्य
व्यवहार ( इथे व्यवहार हा शब्द, साहित्यिक, सामाजिक, आर्थिक, धार्मिक, भौगोलिक अशा व्यापक अर्थाने वापरला आहे) पाहता, हा सर्व व्यवहार अधिक चांगला, सुसूत्रपणे व्हावा या साठी काही सूचना कराव्याशा वाटतात.

१) आज जगात जवळपास १२ कोटी लोक मराठी भाषिक आहेत.त्यामुळे मराठी सर्वाधिक भाषा बोलणाऱ्यांच्या यादीत जगात दहाव्या स्थानावर आहे,ही आपली फार मोठी शक्ती आहे, याचा सर्व मराठी भाषिकांनी अभिमान बाळगून दैनंदिन जीवनात मराठीचाच वापर केला पाहिजे.

२) अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाने त्यांच्या घटनेची मोठ्या प्रमाणात जाहिरात करून विविध संस्था,व्यक्ती यांच्याकडून नवीन कल्पना,हरकती,सूचना मागवाव्यात. जेणे करुन या महामंडळाची कालानुरूप तसेच मराठी भाषेपुढील, साहित्यापुढील आव्हाने विचारात घेऊन घटना तयार करता येऊ शकेल.

३) अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे कार्यक्षेत्र हे रीतसर विश्वव्यापी व्हावे यासाठी अखिल भारतीय ऐवजी जागतिक मराठी साहित्य महामंडळ असे नाम करण करावे.

४) देशात आणि परदेशात होत असलेली संमेलने यांना कशा प्रकारे घटक संस्था म्हणून दर्जा देता येईल,मार्गदर्शन करता येईल याचा विचार करून त्या प्रमाणे नियमावली, कार्य पद्धती निश्चित करण्यात यावी.महामंडळाने अशा छोट्या मोठ्या संमेलनांशी फटकून न वागता, स्वतःला त्यांचा मोठा भाऊ समजून दादागिरी न करता ,आपण या संमेलनाची मातृ संस्था आहोत,अशी विशाल,व्यापक भूमिका घेऊन आई च्या ममतेने या सर्व संमेलनांकडे पाहिले पाहिजे,त्यांची जोपासना, संगोपन केले पाहिजे.

५) आज अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ या
बरोबरच महाराष्ट्र शासनाचा मराठी भाषा विभाग, मराठी विश्वकोश मंडळ,साहित्य आणि संस्कृती मंडळ, राज्य मराठी भाषा विकास संस्था, महाराष्ट्र शासनाचा माहिती तंत्रज्ञान विभाग, महाराष्ट्र ज्ञान महामंडळ, विविध विद्यापीठांचे मराठी भाषा विभाग, नव्याने स्थापन करण्यात आलेले मराठी भाषा विद्यापीठ, विविध मराठी प्रसार माध्यमे,मराठी पत्रकारांच्या संघटना, देश, परदेशातील अन्य ज्या काही संस्था ,व्यक्ती आहेत ,अशा जरी प्रत्येक संस्थेचे उद्देश, स्वरूप,कार्य हे भिन्न असले तरी सर्वांचे मूळ मराठी भाषा आणि त्या अनुषंगाने मराठी माणूस सक्षम,समृद्ध कसा होईल हाच असल्याने या सर्व संस्थानी एकत्र येऊन त्या परस्परपुरक कशा ठरतील, याचा विचार विनिमय करून एक निश्चित दीर्घकालीन कृती आराखडा तयार करावा .यामुळे समाजाला दिशा देण्याची अपेक्षा असलेल्या साहित्याला, साहित्य व्यवहारालाच नवी दिशा मिळेल, असे वाटते.

**देवेंद्र भुजबळ**
**९८६९४८४८००**

# आम्ही मतदारापुरत्याच लाडक्या बहिणी का? गाड्या घोड्या घेतल्या तर नवल झालं का?

**जालना । प्रतिनिधी -** आता आम्ही गाड्या, घोड्या घेतल्या तर काय नवल झालं. ?आम्ही फक्त मतदानापुरत्याच लाडक्या बहिणी झालो का? असा संतप्त सवाल जालन्यातील आज दुपारी चार वाजेच्या सुमारास नूतन वस्ताद परिसरातील लाडक्या बहिणींनी सरकारला विचारला आहे. ? मतदान टाकण्यापूरतेच आम्हाला लाडक्या बहिणी ठरवलं का. ?असाही जाब या महिलांनी सरकारला विचारला आहे.राज्यभरातील लाखो लाडक्या बहिणी फेब्रुवारी महिन्याच्या हप्त्याला मुकल्या आहेत.त्यामुळे राज्य सरकारवर महिलांनी संताप व्यक्त केला आहे.गाड्या,घोड्या आमच्या लेकांनी,सुनांनी घेतल्यात त्या आमच्या काय कामाच्या आहेत. आमच्याकडे पैसे नाहीत आता आम्ही पैसा आधला आणायचा कोठून असाही सवाल महिलांनी सरकारला केला आहे. महिलांच्या आर्थिक विकासासाठी राज्य सरकारने लाडकी बहीण योजना अमलात आणली असून या माध्यमातून महिलांना दरमहा दीड हजार रुपये देण्यात येतात. विधानसभा निवडणुकीपूर्वी महायुती सरकारने महिलांना आमचे सरकार आल्यास एकवीसशे रुपये देऊ असे आश्वासन दिले होते. मात्र अद्याप पर्यंत त्याची अंमलबजावणी झालेली नसून लाडकी बहीण योजनेतून काही महिलांना अटी व शर्ती लावून वागळन्यात येत आहे. त्यामुळे एकीकडे सरकार निवडणुकीपुरता योजनेच्या माध्यमातून महिलांना पैसे देऊ असा प्रचार करत आणि दुसरीकडे निवडणुका उलटून ३ महिने होत आले. मात्र अजून पर्यंत महिलांना २१०० रुपये दिले जात नाहीये त्यामुळे जालन्यातील काही महिलांनी सरकारच्या लाडकी बहीण योजनेचा निषेध व्यक्त करत महिलांना लवकरात लवकर एकवीसशे रुपये देऊन महायुती सरकारने आश्वासनपूर्ती करावी अशी मागणी करण्यात येत आहे. यावेळी नंदाताई पवार जिल्हाध्यक्षा महिला काँग्रेस कमिट जालना, कमलबाई चांदोडे, सावित्री इंगळे, संजीवनी बागडे, मनिषा चांदोडे, राणी आयाळ सह आदींची उपस्थिती होती.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com

# रोटरीचे मोफत प्लास्टिक सर्जरी शिबिर म्हणजे मानव सेवेतील एक पवित्र पाऊल-आ. खोतकर

## रोटरीच्या मोफत प्लास्टिक सर्जरी शिबिराला भेट देऊन केला डॉक्टर्स आणि रोटरी पदाधिकाऱ्यांचा सत्कार

**जालना । प्रतिनिधी -** शारीरिक व्यंगामुळे अनेक रुग्ण मानसिक त्रासाला सामोरे जातात. समाजाकडून त्यांना वेगळी वागणूक मिळते, ज्यामुळे त्यांच्या मनात न्यूनगंड निर्माण होतो. रोटरीतर्फे गेल्या २० वर्षापासून आयोजित केल्या जाणाऱ्या प्लास्टिक सर्जरीमुळे केवळ त्यांच्या शरीरात बदल होत नाही, तर त्यांच्या आत्मविश्वासात मोठी वाढ होते. त्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलते. त्यामुळे प्लास्टिक सर्जरी शिबिर हे केवळ आरोग्यसेवा नव्हे, तर मानवतेच्या सेवेसाठी टाकलेले एक पवित्र पाऊल आहे. यामुळे गरजू लोकांना आत्मसन्मानाने जगण्याची संधी मिळते, असे गौरवोद्गार आ. अर्जुनराव खोतकर यांनी काढले.

रोटरी क्लब ऑफ जालना, रोटरी क्लब ऑफ बॉम्बे मिडटाउन आणि रोटरी क्लब ऑफ ह्याटीनजेन यांच्या संयुक्त विद्यमाने मिशन हॉस्पिटलमध्ये २२ फेब्रुवारीपासून सुरू झालेल्या दहा दिवसीय मोफत प्लास्टिक सर्जरी शिबिराला आज गुरुवारी (दि. २७) आ. खोतकर यांनी भेट देऊन पाहणी केली.

आ. खोतकर यांनी शस्त्रक्रियेनंतर विश्रांती घेत असलेल्या रुग्णांची आस्थेवाईकपणे चौकशी केली. त्यांना धीर देत म्हणाले, आजचा दिवस तुमच्यासाठी नवा सूर्योदय आहे. तुम्ही निर्धास्त राहा. तुम्हाला मिळालेल्या या नवीन संधीचा आनंद घ्या आणि नव्या आत्मविश्वासाने आयुष्य जगण्यास सुरुवात करा. आज येथे येऊन मी एक विलक्षण सामाजिक उपक्रम प्रत्यक्ष अनुभवला. हे शिबिर केवळ एका आरोग्यसेवेचा भाग नाही, तर एखाद्याच्या आयुष्याला नवीन दिशा देणारे कार्य आहे. ज्या रुग्णांना समाजाने वेगळ्या नजरेने पाहिले, त्यांना या उपचारांमुळे आत्मविश्वास मिळत आहे. त्यांच्या चेहऱ्यावरचे आनंदाश्रू पाहूनच या उपक्रमाची खरी यशस्वीता लक्षात येते. समाजातील गरजू रुग्णांना नवी आशा आणि नवा आत्मविश्वास देणारे हे शिबिर म्हणजे खरं तर एक आरोग्यसेवेचे मंदिर आहे.

या शिबिरामुळे केवळ रुग्णांचे शरीर नाही, तर त्यांचे जीवनही बदलत आहे. गरिबांसाठी मोफत प्लास्टिक सर्जरी करून त्यांचे आयुष्य सुखकर करण्याचे कार्य रोटरी क्लब गेली दोन दशके करत आहे, हे अत्यंत स्तुत्य आहे, असे ते म्हणाले.

प्रारंभी क्लबचे अध्यक्ष डॉ. दीपक बगडिया यांनी शिबिराची सविस्तर माहिती आ. खोतकर यांना दिली. यंदाच्या शिबिरात दहा दिवसांत १४० प्लास्टिक सर्जरी करण्यात येणार असून, जर्मन डॉक्टरांच्या तज्ज्ञ टीमने गेल्या सहा दिवसांतच ६९ शस्त्रक्रिया पूर्ण केल्या असल्याचे त्यांनी सांगितले.







**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता सा.बां. विद्युत विभाग,**

**छत्रपती संभाजीनगर,**

**ब - १ - निविदा सुचना क्र ७३ सन - २०२४-२५**

कार्यकारी अभियंता, औरंगाबाद सा. बां विद्युत विभाग, ब-१ टक्केवारीच्या ई - प्रणालीद्वारे निविदा मागविण्यात येत आहेत. कोऱ्या निविदा नमुना **http://mahapwd.gov.in/** या संकेत स्थळावर **दि. २८/०२/२०२५ वेळ १०.00 ते दि. ०७/०३/२०२५ वेळ १७.३०** पर्यंत ऑनलाईन डाऊनलोड करण्याकरीता उपलब्ध होतील.

टिप - सदर निविदा सुचनेमध्ये १५ कामे प्रस्तावित करण्यात आली आहेत.

जा.क्र. काअ/छसंविवि/निविदा ६८७/२०२५ दि. २९/०२/२०२५

**सही**

**कार्यकारी अभियंता**

**सा.बां. विद्युत विभाग छत्रपती संभाजीनगर**

संमा/छत्रपती संभाजीनगर/जाहिरात/३६१/२०२४-२५


पान १ वरुन

### इकरा अपहरण ...

अध्यक्ष कल्याणराव तार्डे, अंबड शहराध्यक्ष जाकीरभाई डावरगावकर, माजी नगरसेवक शेख शकील लालमिया, हाजी अब्दुल हमीद, माजी नगरसेवक सय्यद अझहर, युवक काँग्रेस जालना विधानसभा अध्यक्ष शेख वसीम, काँग्रेसचे जिल्हा सचिव लक्ष्मणराव बोंबले आणि रसूलभाई यांनी आज गुरुवार दि. २७ फेब्रुवारी रोजी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर केले. त्यात म्हटले आहे की, अंबडमध्ये घडलेल्या या धक्कादायक घटनेला ४६ दिवस उलटूनही कोणतेही ठोस निष्कर्ष समोर आलेले नाहीत. अपहरणाच्या सुरुवातीच्या २४ तासांतच प्रभावी तपास होणे अपेक्षित होते, मात्र तसे झाले नाही. प्रशासनाच्या दिरंगाईमुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप निर्माण झाला असून, शहरात असुरक्षिततेचे वातावरण आहे.या प्रकरणाचा तपास तातडीने जलदगतीने करण्यात यावा तसेच दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी खासदार डॉ. कल्याण काळे यांनी केली आहे. जर प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केले, तर तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे. कुटुंबाला न्याय मिळेपर्यंत काँग्रेस पक्ष तडजोड करणार नाही व या प्रकरणाचा तपास जलदगतीने व्हावा यासाठी लढा सुरूच राहील, असा निर्धार काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. अंबडमध्ये निर्माण झालेल्या असुरक्षिततेच्या वातावरणामुळे नागरिकांमध्ये भीती आहे. पोलीस प्रशासनाने तत्काळ उच्चस्तरीय तपास करून सत्य समोर आणावे, जेणेकरून नागरिकांचा विश्वास प्रशासनावर पुन्हा बसू शकेल, असे खा. डॉ. कल्याण यांनी निवेदनात म्हटले आहे.

### देशातील युवा ...

बाळगून हे युवक त्या दिशेने जात आहेत. भारतातून जवळपास तीन कोटी युवक हे परदेशात आहेत. याला हे सरकार आणि शासन जबाबदार आहे. ही परिस्थिती बदलायला हवी. आणि त्यासाठी समाजवादी पक्षाच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी मेहनत घेऊन देशात आणि राज्यात समाजवादी विचारांचे सरकार आणणे गरजेचे आहे. सध्या समाजवादी पक्ष देशात तिसऱ्या क्रमांकाचा मोठा पक्ष आहे. पक्षाचे देशात ३८ खासदार आहेत. याला नंबर वन वर घेऊन जाण्यासाठी सर्वांनी एकदिलाने प्रयत्न करणे आवश्यक असल्याचेही ते म्हणाले. आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती, महानगर पालिका, नगर पंचायत निवडणुकीत कार्यकर्त्यांनी सर्वस्व पणाला लावून निवडणुकीत उतरावे जास्तीत जास्त जागांवर समाजवादी पक्षाचे उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरावेत तसेच त्यांना निवडून आणण्यासाठी सर्वांनी एक होऊन प्रयत्न करावे असा सल्ला देखील त्यांनी जिल्ह्यातील पदाधिकारी कार्यकर्त्यांना दिला.

राज्य सरचिटणीस डॉ. अब्दुल रऊफ म्हणाले की, जालना जिल्ह्यात समाजवादी पक्षाची मोठी ताकद आहे. अशावेळी आठही तालुक्यासह जिल्ह्याभरातील नगर पंचायत, महानगर पालिका, पंचायत समिती, जिल्हा परिषदेत स्वबळावर निवडणुक लढविण्याच्या दिशेने तयारी करावी. ही कार्यकर्त्यांची निवडणूक आहे. या ठिकाणी कोणत्या पक्षाची युती-आघाडी करायची याचा सर्वस्वी अधिकार येथील जिल्हाध्यक्ष व शहराध्यक्षांना आहे. त्यांच्याकडुन आलेल्या शिफारशींचाच उमेदवार निवडतांना विचार करण्यात येणार असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

दरम्यान, समाजवादी पक्षाच्या शिक्षक विंगमध्ये मराठवाडा विभागावर नागसेन बनकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे, मराठवाडा सदस्यपदी प्रभाकर दांडगे, तालुका कार्याध्यक्ष दिलशाद खान, शहराध्यक्ष दीपक शेळके, शहर उपाध्यक्ष सोफियान कुरैशी, सदस्यम्हणून लाला कुरैशी, जुबेर कुरैशी, शालीक दाभाडे, माणिक दाभाडे, म्हस्के, जाधव आदींची नियुक्ती करण्यात आली.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन जिल्हा सचिव शेख मुजिबुद्दीन तर आभार परतूर शहराध्यक्ष श्री घनपटे यांनी मानले.

यावेळी समाजवादी पक्षाचे प्रो. साबेर, शेख जहिर, इम्रान खान, सलमान खान, शेख इद्रीस, लाला कुरैशी, अझरुद्दीन, अफरोज पठाण, नारायण पाटील, साहेबराव कडाळे, शेख अब्बास, शेख मोहसिन, शेख अकबर, इरफान बेग मिर्झा यांच्यासह पदाधिकारी कार्यकर्ते आदींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### मानवी जीवनात ...

परंपरा मोठी असून, महाराष्ट्रातील मोठे विचारवंत व साहित्यिक या विभागाचे विद्यार्थी राहिलेले आहेत, तिच परंपरा आजही सुरू असल्याचे असेही डॉ. सोनुने यांनी सांगितले.

काव्यधारा कवीसंमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना , श्रीमती मंगला धुपे म्हणाल्या की, कविता ही आयुष्यात सहज उलगडत जाणारी सुख-दुःखाची सखी आहे, कवितेतून मानवी जीवनातील सुखद व दुःखद प्रसंगाची आठवण होते, पुढे हीच कविता मानवी जगणं बनते असेही श्रीमती धुपे यांनी सांगितले.

या उद्घाटन सत्राचे अध्यक्षीय भाषण करताना प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री म्हणाले की, मराठी साहित्यमध्ये विविध रंग दिसून येतात, स्त्रियांच्या कवितेविषयी बोलताना ते म्हणाले की, अव्यक्त ब्रह्म केवळ स्त्रियाच व्यक्त करू शकतात, कविता जीवनाला आकारच नव्हे तर आनंदही देते. या सत्राचे सूत्रसंचालन प्रा. विद्या मालानी यांनी तर आभार प्रदर्शन प्रा.बाबुराव श्रीरामे यांनी केले.

दुसऱ्या सत्रामध्ये निमंत्रित कवयित्रींनी 'काव्यधारा' या कवीसंमेलनात आपल्या दर्जेदार अशा काव्य रचना सादर केल्यात. कविता नरवडे यांनी, 'किती पेटलेत ग आंदोलने..., मायबोली बोलली म्यानातली तलवार लढणार कधी...,कवयित्री 'आरती सदावत्रे सदावर्ते यांनी, कृष्णा शस्त्रे पुरव , नको पुरवू वस्त्रे,ही कविता सादर करून स्त्रियांचे दुःखांचे पदर व्यक्त केलेत. वैशाली फोके यांनी 'आमचं चाललंय मस्त, उभ्या पिंजऱ्याला जगणं बंदिस्त... ही स्त्रियांची व्यथा मांडणारी कविता सादर केली.

कवयित्री रेखा गतखने यांनी,' खरंच जीवन सुंदर आहे, ध्येय ठेवून जगले पाहिजे.' ही कविता सादर केली. कवयित्री रत्नमाला मोहिते यांनी, 'शरीर म्हातारे झालं तरी, मन म्हातारे झाले नाही ,माहेरच्या मायपनात, मी माय झाले...' ही स्त्रियांची जीवनावरील कविता सादर केली. छत्रपती संभाजी नगर येथील प्रसिद्ध कवयित्री प्रिया धारूरकर यांनी, 'पुन्हा पुन्हा तू पेरत गेली, सवेदनाचा झरा, संवेदनाचा झरा.. कवितेची गाणी काळजात रुतल्या, अक्षराच्या धारा... जालन्याच्या सत्यशीला तोर यांनी 'एक दिवस मन करून घट्ट बसते थक्क... सांभाळाया.. सांभाळाया. ' महिलांच्या वेदना दर्शवणारी दर्जेदार कविता सादर केली.

जालन्यातील सुप्रसिद्ध कवयित्री डॉ .संजीवनी तळेगावकर यांनी 'काही हरवले, काही गवसले, मन कावरले,मन बावरले... तुझ्यात माझा, माझ्यात तुझा गुंता... तुला न कळले.. मन बावरले' ही गेय कविता सादर करून काव्य रसिकांची वाहवा ..मिळवली.

कवी संमेलनाच्या अध्यक्षा शिक्षणाधिकारी मंगला धुपे यांनी, 'या काळजाच्या रेषा,

चिमुकल्या डोळ्यांमध्ये स्वप्न उदयाचे साठले...... सावली ग.. गोदामाई.. गोरगरिबांची तू आई, धान्य -धान्यने भरले तू ज्वारीचे कणसे... ही गेय कविता सादर करून सभागृहामध्ये टाळ्यांचा गडगडाट निर्माण केला.

या काव्यधारा कवी संमेलनाचे सूत्रसंचालन कवयित्री सत्यशीला तौर यांनी केले, तर उपस्थिताचें आभार प्रा. बाबासाहेब खंडागळे यांनी मानलेत.

या कवी संमेलनासाठी महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनी,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच जालना शहरातील काव्य रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.





**समाजवादी पक्षाचे राज्य उपाध्यक्ष डॉ. प्रभाकर जोशी पाटोदेकर (पहिले छायाचित्र) व राज्य सरचिटणीस डॉ. अब्दुल रऊफ (दुसरे छायाचित्र) यांनी गुरुवार (दि. २७) रोजी दैनिक युवा आदर्श कार्यालयास सदिच्छा भेट दिली यावेळी युवा आदर्शचे संपादक दीपक शेळके यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी समाजवादी पक्षाचे जालना जिल्हाध्यक्ष शेख नबी सिपोराकर, तालुका कार्याध्यक्ष दिलशाद खान आदींची उपस्थिती होती.**

# शिक्षणात येणाऱ्या नवीन आव्हानासाठी प्रशिक्षणातून समृद्ध व्हावे - प्रेरणा मोरे

**दत्ता देशमुख**

**जाफराबाद -** येथे शिक्षक समृद्धी प्रशिक्षण सुरू आहे. या प्रशिक्षणासाठी शिक्षण प्रशिक्षण संस्थेच्या अधिव्याख्याता प्रेरणाताई मोरे, शिक्षक प्रशिक्षण संस्थेचे सामाजिक शास्त्र



विभागाचे अधिव्याख्याता भरत सूर्यवंशी, यांनी भेट दिली. याप्रसंगी प्रशिक्षणाच्या संयोजकाकडून त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. प्रेरणाताई मोरे यांचे स्वागत साने मॅडम, तर भरत सूर्यवंशी यांचे स्वागत वसंता शेवाळे यांनी केले. याप्रसंगी व्याख्यान देताना, प्रशिक्षणार्थाना मार्गदर्शन करताना प्रेरणादायी मोरे यांनी सांगितले की शिक्षक समृद्ध झाला पाहिजे शिक्षकाचे सक्षमीकरण झालं पाहिजे, एन ए पी, एन सी एफ, एस सी एफ, या संकल्पना समजावून घेऊन भविष्यामध्ये येणाऱ्या अभ्यासक्रमाच्या संदर्भातील संकल्पना, क्षमता विकसन, हे समजून घेतले पाहिजे. प्रशिक्षणातूनच शिक्षक समृद्ध होतो. याप्रसंगी भरत सूर्यवंशी यांनी शिक्षकांना मार्गदर्शन करताना सर्व संकल्पना समजून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. प्रशिक्षणात पूर्णवेळ उपस्थित राहण्याचे ही आव्हान त्यांनी यावेळी केले. पूर्णवेळ उपस्थित राहून या ठिकाणी होणाऱ्या व्याख्यानांचा लाभ घेतला पाहिजे. प्रशिक्षणातूनच आपण समृद्ध होतो ही संकल्पना आता रुजत आहे. एन ए पी २०२० मधून प्रत्येक वर्षी शिक्षकांना ५० तासाचे प्रशिक्षण आवश्यक केले असून त्यासाठी हे प्रशिक्षण आयोजित केले आहे. या तालुक्यातील सर्व शिक्षकांनी लाभ घेतला पाहिजे. तज्ञ मार्गदर्शकाकडून येणाऱ्या अडचणी समजावून घेतल्या पाहिजे चर्चा केली पाहिजे गटचर्चा केली पाहिजे. हे समजावून सांगितले. याप्रसंगी तज्ञ मार्गदर्शक प्राध्यापक दत्ताजीराव देशमुख टेंभुर्णीकर, तज्ञ सुलभक नारायण पिंपळे, तज्ञ सुलभक दत्ता गवळी, तज्ञ सुलभक विजयराव बंड, तज्ञ सुलभक व्हीबी कणखर, गट समन्वयक वसंतराव शेवाळे, यांची आवर्जून उपस्थिती होती. याप्रसंगी प्राध्यापक दत्ताजीराव देशमुख टेंभुर्णीकर यांनी आभार मानले.

## रमजानच्या पार्श्वभूमीवर मुस्लिम बहुल भागात स्वच्छतेसह नागरी सुविधा द्यावी - पाडेवार

**परतूर । प्रतिनिधी -** पवित्र रमजान महिना लवकरच सुरु होणार असून परतूर शहरातील सर्वच प्रभागातील मुस्लिम बहुल भागांमध्ये नगरपालिकेने स्वच्छता अभियान राबवून नागरी सुविधा द्याव्यात अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते अर्जुन पाडेवार यांनी केली आहे. दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की,पवित्र रमजान महिना २ मार्चपासून सुरु होत आहे.या कालावधीत मुस्लिम बांधव संपूर्ण महिनाभर उपवासासह अल्लाहची उपासना करतात.यामध्ये छोट्या बालकांसह तरुण तसेच वृद्धमंडळींचा समावेश असतो.परंतु सध्या शहरात अनेक नागरी समस्या दिसून येतात. रमजान महिन्याच्या पार्श्वभूमीवर शहरातील सर्वच प्रभागातील मुस्लिम बहुल भागांमध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था सुरळीत करणे, विद्युत जोडणी पूर्ण करणे तसेच परिपूर्ण स्वरूपात स्वच्छतेची कामे करणे इत्यादी कामे प्राधान्याने व पवित्र रमजान महिना सुरू होण्यापूर्वीच करावीत जेणेकरून सर्व प्रभागातील प्रमुख रस्ते,नाल्याची साफसफाई होईल असे दिलेल्या निवेदनात पाडेवार यांनी म्हटले आहे.

## अभ्यास करून बोला

### आशिष शेलार यांच्या वक्तव्याला रवींद्र राऊत यांचे प्रतिउत्तर

**जालना । प्रतिनिधी -** मराठी माणसांसाठी महाराष्ट्र नव निर्माण सेनेने केलेल्या कार्याची माहिती आशिष शेलार यांनी घ्यावी त्याचा अभ्यास करावा आणि नंतर बोलावे असे मनसे जालना जिल्हाध्यक्ष रवींद्र राऊत यांनी म्हटले आहे. आशिष शेलार यांनी केलेल्या वक्तव्याला त्यांनी प्रतिउत्तर दिले. श्री राऊत म्हणाले की, राज ठाकरे यांच्याकडे जाऊन मार्गदर्शन घेता, स्वतःची पोळी भाजून घेता, कढी भात खावून जातात त्यावेळी त्यांच्या लक्षात आले नाही का बोलाची कढी आणि बोलाचाच भात कशी असते. त्यांनी वृत्तपत्रे वाचावी, अभ्यास करावा आणि नंतर बोलावे.

# विज्ञानाचे रहस्य उलगडताना

सर्वप्रथम आपण सर्वांना २८ फेब्रुवारी २०२५ च्या हार्दिक शुभेच्छा. आजचा दिवस विज्ञानाच्या महत्त्वाला ऊजागर करणारा आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाला प्रोत्साहन देणारा एक अत्यंत महत्त्वाचा दिवस आहे. आपल्या देशातील महान शास्त्रज्ञ डॉक्टर सी. व्ही. रमण यांच्या कार्याचे स्मरण करण्यासाठी साजरा केला जातो डॉक्टर सी. व्ही. रमण यांना १९३० मध्ये रमण इफेक्ट शोधासाठी नोबेल पारितोषिक मिळाले. त्यांनी आपल्या शास्त्रीय शोधांच्या मार्गाने आपला देश आणि जग सशक्त करण्याचे मार्ग दाखवले. त्यांच्या या यशामुळे संपूर्ण जगाला भारताच्या विज्ञान क्षेत्रातील योगदानाचा मोठा आधार मिळाला. आजच्या या महत्त्वाच्या दिवशी आपल्याला विज्ञानाचा अभ्यास करून आपल्या जीवनात नवनवीन शोध घेण्याची प्रेरणा मिळावी. विज्ञान हे केवळ अभ्यास किंवा प्रयोगाचे क्षेत्र नाही तर ते आपल्या विचारशक्तीला चालना देणारे आपल्या दृष्टिकोनाला विस्तारित करणारे आणि आपल्या समाजाच्या प्रगतीसाठी आवश्यक आहे. विज्ञानाच्या या मार्गावर चालत आपण नवे विचार, नवे शोध, नवे तंत्रज्ञान आणि नवीन संधी शोधू शकतो. माझी शाळा पीएमश्री योजनेअंतर्गत निवड झालेली ग्रामीण भागातील शाळा आहे. शाळेतील विद्यार्थ्यांच्या विचारशक्तीला चालना देऊन चिकित्सक वृत्तीचा विकसित करणे व भविष्यातील आव्हानांना त्यांनी सक्षमपणे सामना करावा त्यांना ते पेलता यावी आलोचनात्मक विचार करणे नवीन तंत्रज्ञान आणि शोधाबद्दल जागरूक होणे समाजाच्या प्रगतीसाठी योगदान देणारे विद्यार्थी घडावे. आपल्या राष्ट्रसमोर बेरोजगारी, पेयजल, भ्रष्टाचार, महागाई, ऊर्जा, पर्यावरण, प्रदूषण, वाढते शहरीकरण इत्यादी अनेक समस्या आहेत. या सर्व समस्यांचे मूळ हे कुठेतरी विज्ञानात आपल्याला दिसून येते. देशाच्या व नागरिकांच्या सामाजिक आर्थिक आणि शैक्षणिक गरजा मात्र वेगाने बदलत आहे. त्यातूनच राष्ट्रसमोर अनेक आव्हाने आहेत आणि या आव्हानांचा सामना करायचा असेल तर त्याला एकमेव पर्याय आहे. आपल्यासमोर दिसतो तो म्हणजे विज्ञानाची राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील भूमिका. भारताला जागतिक ज्ञान महासत्ता बनवण्याचे उद्दिष्ट या धोरणाने आपल्यासमोर आहे. जागतिक दर्जाचे नागरिक घडविण्याची जबाबदारी ही शिक्षण व्यवस्था अभ्यासक्रम आणि शिक्षकांवर आलेली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या चिकित्सक विचार व सर्जनशीलतेला वाव देण्यासाठी विज्ञानाच्या विविध पद्धती तंत्रज्ञान खचा उपयोग होत आहे व त्यातूनच २१ व्या शतकातील कौशल्य मुलांमध्ये विकसित होण्यास मदत होत आहे.

माझ्या शाळेत आनंददायी शनिवार दप्तर मुक्त शाळा या उपक्रमांतर्गत शाळेतील श्री एच.व्हि. निकम सर व विज्ञान शिक्षक श्री. आर.एफ. पैठणकर सर व शाळेचे मुख्याध्यापक श्री. एस. व्ही. शेळके सर व सर्व शिक्षकवृंद यांच्या सहकार्याने विज्ञान विषयाची गोडी लागावी म्हणून विविध प्रयोगाचे आयोजन आयोजन करत असतो. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये खालील गुण विकसित होण्यास मदत होत आहे.

वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होण्यास मदत होत आहे.

आलोचनात्मक विचार विश्लेषणात्मक क्षमता आणि प्रायोगिक दृष्टिकोन विकसित होण्यास मदत होताना दिसत आहे. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन तयार होतो. जो त्यांना समस्येचे निराकरण करण्यासाठी आणि नवीन प्रभावी पद्धती शोधण्यास प्रेरित करत आहेत.

सामाजिक आणि आर्थिक प्रगती.

विज्ञानामुळे देशाची समाजाची गावाची व शाळेची प्रगती साधता येते. विद्यार्थ्यांना विज्ञान तंत्रज्ञान अभियांत्रिकी आणि गणित स्टीम क्षेत्रात करिअर करण्याच्या संधी मिळत आहे. मागील दहा वर्षापासून या क्षेत्रामध्ये अनेक विद्यार्थीनी आपले करिअर घडवले आहे.

प्राकृतिक आणि पर्यावरणीय जागरूकता.

विज्ञानाच्या शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संरक्षणाची निसर्गाच्या महत्त्वाची आणि त्याचे संतुलन राखण्याची जागरूकता निर्माण होण्यास मदत होत आहे. विज्ञान विषयी विद्यार्थ्यांना पर्यावरणीय आव्हानांना विचार करण्याची आणि त्यावर उपाय शोधण्याची क्षमता विकसित करण्यासाठी मदत होत आहे. विविध उपक्रमाची आयोजन शाळा स्तरावर केले जाते. आमच्या शाळेत पर्यावरण जागृती म्हणून सेल्फी विथ ट्री या उपक्रमांतर्गत अकराशे बेल वृक्ष विद्यार्थ्यांनी आजूबाजूच्या परिसरात वृक्षारोपन केले प्रत्येक वाढदिवसाला ते त्यांच्या झाडाच्या फोटो सोबत सेल्फी घेऊन शाळेने तयार केलेल्या ग्रुप स्वतःची सेल्फी टाकतात. प्राचीन परंपरा तसेच संस्कृतीचे जतन व संवर्धन करण्यास मदत होत आहे. व राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या उद्दिष्टानुसार प्राचीन परंपरा व ज्ञान याची नाळ विद्यार्थ्यांची जोडली जात आहे.

नवीन तंत्रज्ञानाची ओळख.

डिजिटल साधनांचा वापर करून स्मार्ट कक्ष प्रयोगशाळा त्याचबरोबर ख तंत्रज्ञान मानवाच्या प्रगतीसाठी कसे फायद्याचे किंवा तोट्याचे आहे. यावर आधारित वादविवाद, चर्चासत्र, निबंध स्पर्धा यात विद्यार्थ्यांचा सहभाग नोंदवून जागतिक स्तरावरच्या माहितीची विद्यार्थ्यांना ओळख करून दिली जात आहे. त्याचबरोबर परिपाठातून यावर प्रकाश टाकला जातो. जागतिक स्तरावर चालू असलेला घडामोडी व त्याचा भारतीय जीवनावर होणारा परिणाम याची सुद्धा ओळख विद्यार्थ्यांना करून दिली जाते.

वैज्ञानिक संशोधनाची प्रेरणा.

विविध शास्त्रज्ञ यांची जयंती निमित्य त्यांची माहिती सांगणे. विज्ञानातील नवीन नवीन शोध, संशोधन यांची माहिती विद्यार्थ्यांना विविध उपक्रमातून करून दिली जाते. वैज्ञानिक प्रश्न विचारण्याची आणि त्यावर प्रयोग आणि अभ्यास करून उत्तर शोधण्याची क्षमता निर्माण होत आहे. क्षमता भविष्यामध्ये त्यांना संशोधनाच्या क्षेत्रात काम करण्याची साठी प्रेरणादायी ठरेल. त्याचबरोबर डॉक्टर होमी बाबा तसेच महादीप सारख्या परीक्षेत विद्यार्थ्यांना बसवून त्यांना विज्ञान क्षेत्रात चालणाऱ्या घडामोडी याची ओळख करून दिली जात आहे.

अवधारणात्मक आणि व्यवहारिक शिक्षणावर भर.

विज्ञान विषयातील अभ्यास केवळ सिद्धांतावरच नाही तर प्रत्यक्ष प्रयोग करून प्रयोगशाळा आणि शालेय उपक्रम द्वारे शिकवले जाते. या व्यवहारिक शिक्षणामुळे त्यांचे ज्ञान दैनंदिन जीवनाशी जोडणे सहज शक्य झाले आहे. घरात वापरण्यात येणाऱ्या विविध वस्तू जसे मीठ याची रासायनिक नाव छराउश्र खाण्याचा सोडा(छक्ख३) धुण्याचा सोडा (छर२उ३) टूथपेस्ट त्यानंतर चहा बाजारातील चिवडा शेतातील फवारणी करत असताना वापरणारे औषध यांचे मिश्रण अशा त्याचबरोबर शेतातील खते यामध्ये असणारी घटक कसे वापरले जातात याची सुद्धा जाणीव करून व्यावहारिक जीवनाशी संबंध जोडला जातो.

भविष्यात नेतृत्व क्षमता विकसित करण्यास मदत होते.

विज्ञानातून विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व आणि समस्या सोडवण्याची क्षमता निर्माण होण्यास मदत होत आहे. आधुनिक विचारधारा आणि समाजातील समस्या सोडवण्यासाठी नेतृत्व गैरवण्यासाठी मदत होत आहे.

**एच. व्हि. निकम . (गणित / विज्ञान) (एम.एससी.एम.एड),**

शाळा : - पीएमश्री जि.प. प्रशाला नळणी खु. ता. भोकरदन जि. जालना.